


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

॥ आजचा सुविचार ॥
आयुष्य हे सायकल
चालवण्यासारखे आहे,
तोल सांभाळण्यासाठी
चालत राहणे आवश्यक आहे.

वर्ष : ०६ | अंक : ३२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१५ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पुणे रिंग रोडभोवतीच्या ११७ गावांच्या विकासाला नियोजनाचा नकाशा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या बाह्यवळण रिंग रोडभोवतीच्या ११७ गावांच्या विकासाला आता नियोजनाचा 'नकाशा' मिळणार आहे. या गावांचा सविस्तर विकास आराखडा (डीपी) तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) वेगाने सुरू असून, अस्तित्वातील जमिनींच्या वापराचे सर्वेक्षण (ईएलयू) पूर्ण झाले आहे.

**डीपी तयार करण्याचे उद्दीष्ट**

भविष्यातील विकासासाठी आवश्यक प्रकल्प आणि त्यासाठी लागणाऱ्या जागांचे नियोजन (पीएलक्यू) अंतिम टप्प्यात असून, येत्या चार महिन्यांत डीपी तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**'एमएसआरडीसी'ला जबाबदारी**

या ११७ गावांचे 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून'एमएसआरडीसी'ला सुमारे दोन वर्षांपूर्वी राज्य सरकारने जबाबदारी दिली. हवेली, भोर, पुरंदर, वेल्हे आणि मुळशी तालुक्यांतील या गावांचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यटन आणि पायाभूत सुविधांच्या दृष्टीने नियोजनबद्ध विकास करण्याचा आराखडा तयार केला जात आहे.

**जमिनींच्या वापराचे नियोजन**

११७ गावांच्या 'डीपी'मध्ये पुरंदर विमानतळाजवळील सासवड आणि सिंहगड किल्ला परिसर ही दोन ग्रोथ सेंटर केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहेत. रिंग रोडमुळे या भागांची कनेक्टिव्हिटी वाढल्यानंतर होणारे नागरीकरण, व्यवसाय आणि पर्यटनवाढ लक्षात घेऊन जमिनींच्या वापराचे नियोजन केले जाणार आहे.



**जागा आरक्षित करण्याचे नियोजन**

मुळशीचा बहुतांश भाग डोंगर-दऱ्यांचा असल्याने या भागात पर्यटनाला विशेष प्राधान्य देण्याचा विचार आहे. त्याचबरोबर औद्योगिक हब, लॉजिस्टिक पार्क यांसारख्या सुविधांसाठी योग्य जागांचा शोध घेतला जात आहे. केवळ रस्ते आणि बांधकामांपुरता 'डीपी' मर्यादित न ठेवता पाणीपुरवठ्याच्या टाक्या, क्रीडांगणे, खुल्या जागा, स्मशानभूमी, अग्निशमन केंद्रे आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांसाठी जागा आरक्षित करण्याचे नियोजन आहे.

**भविष्यातील वाहतूक गरजा**

जागा निश्चितीसाठी ड्रोन सर्वेक्षणही केले जाईल. रिंग रोडच्या प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या मार्गांचा गावांच्या विकासावर होणारा परिणामही 'डीपी'मध्ये विचारात घेतला जात आहे. विद्यमान ११७ गावांच्या आराखड्यात मेट्रोचा समावेश नसला, तरी भविष्यातील वाहतूक गरजा लक्षात घेऊन त्याचा विचार होऊ शकतो.

## सीमेवर तैनात असणाऱ्या जवानाच्या पत्नीने लेकरासह स्वत:ला संपवलं



**दि.१४, जळगाव :** सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम सुरू होती. प्रत्येकाच्या घरी गणेश उत्सवाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरु होती. मात्र जळगाव शहरातील २८ वर्षीय हेमांगीच्या मनात वेगळेच विचार सुरू होते. याच आनंदाच्या वातावरणात जळगाव शहरात एक अशी काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली, जिने प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आणले आणि सर्वांचेच मन सुन्न करून सोडले. २८ वर्षीय आईने आपल्या पाच वर्षाच्या मुलासह स्वत:ला संपवले.

जळगावमधील तळेले कॉलनीतील 'विघ्नहर्ता' चौकाजवळ राहणाऱ्या महाजन कुटुंबावर अचानक दु:खाचा डोंगर कोसळला आहे. अवघ्या २८ वर्षांच्या हेमांगिनी निखील महाजन यांनी आपल्या अवघ्या ५ वर्षांच्या निष्पाप, गोंडस शौर्यला सोबत घेऊन आयुष्याचा प्रवास कायमचा थांबवला. दोघांनीही गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.

**हेमांगीचे पती भारतीय सैन्य दलात राजस्थान येथे होते रुजू**

विशेष म्हणजे हेमांगिनी यांचे पती, निखील महाजन हे भारतीय सैन्यदलात राजस्थान येथे कार्यरत असून, आपल्या मातृभूमीचे रक्षण करत आहेत. देशाच्या रक्षणासाठी सीमेवर तैनात असलेल्या जवानाच्या घरातच असा दु:खाचा डोंगर कोसळावा, या कल्पनेनेच अनेकांच्या काळजाचे पाणी होत आहे.

सोमवारी दुपारच्या सुमारास घरात सन्नाटा पसरला होता. हेमांगिनी आणि चिमुकला शौर्य दोघेच खालील मजल्यावर होते, तर उर्वरित कुटुंब वरच्या मजल्यावर होतं. सायंकाळी जेव्हा निखील यांची आई खाली आली, तेव्हा दरवाजा आतून बंद होता. खूप हाका मारूनही, दार ठोठावूनही आतून कोणताही प्रतिसाद आला नाही. त्यांनी शेजाऱ्यांना आणि इतरांना गोळा केले. दार उघडताच समोर जे दृश्य होतं, त्याने उपस्थितांच्या पायाखालची जमीनच सरकली.

**निष्पाप 'शौर्य'ची काय चूक होती?**

गणेशोत्सवाची धामधूम म्हणजेच लहान चिमुकल्यांचा लाडका बाप्पा या लाडका बाप्पाच्या आगमनासाठी लहान चिमुकले देखील उत्साही असतात. मात्र शौर्य या उत्साहापासून लांबच होता. आईसोबत हसत-खेळत राहणाऱ्या त्या ५ वर्षांच्या निष्पाप शौर्यला कदाचित हेही ठाऊक नसेल की आजचा दिवस त्याचा शेवटचा ठरणार आहे. ज्या वयात हातामध्ये बाप्पाचा प्रसाद आणि खेळणी असायला हवी होती, त्या वयात या जगाचा असा करुण निरोप घ्यावा लागला, हे आठवूनही सर्वांचे डोळे पाणवत आहेत.

शनिपेठ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आहे.

महाजन कुटुंब परिसरात अत्यंत नम्र, मनमिळाऊ आणि सर्वांशी आपुलकीने वागणारे म्हणून ओळखले जायचे. त्यामुळेच, ज्या विघ्नहर्त्याच्या नावाने हा परिसर ओळखला जातो, त्याच 'विघ्नहर्ता' चौकात घडलेल्या या दुर्देवी घटनेने संपूर्ण शहरावर शोककळा पसरली आहे.

## १२ वर्षांची प्रतीक्षा संपली; डोणगाव रोड अखेर चकाचक!

### आमदार कोठे, आमदार देशमुख व नगरसेविका आरतीताई वाकसे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१४, सोलापूर :** शहरातील लक्ष्मी-विष्णू मिल चाळ येथील नागोबा मंदिरापासून न्यू हायस्कूल, सलगरवस्तीपर्यंतच्या प्रमुख डांबरी रस्त्याचे गेल्या सुमारे बारा वर्षांपासून प्रलंबित असलेले काम अखेर पूर्ण झाले आहे. या रस्त्यामुळे सलगरवस्ती, सेटलमेंट परिसरासह दक्षिण सोलापूर मतदारसंघातील अनेक गावांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आता नागरिकांसाठी सुकर झाला आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

शहर मध्य मतदारसंघातून सुरू होणारा हा प्रमुख रस्ता दक्षिण सोलापूर मतदारसंघातील सलगरवस्ती भागापर्यंत जात असल्याने या मार्गाचे नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीच्या दृष्टीने मोठे महत्त्व आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वाहनधारक तसेच पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर डांबराच्या वाढलेल्या दरामुळे काही काळ काम पुन्हा रखडले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, रस्त्याचे काम पूर्ण व्हावे यासाठी नगरसेविका आरतीताई अक्षय वाकसे यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. त्यांच्या प्रयत्नांमुळे रखडलेले काम पुन्हा मार्गी लागून अखेर पूर्ण झाले.



या रस्त्याच्या कामासाठी भारतीय जनता पार्टीचे शहर मध्य मतदारसंघाचे आमदार देवेंद्र (दादा) कोठे तसेच दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष (बापू) देशमुख यांनीही प्रयत्न केले. तसेच या कामाला सहकार्य आणि पाठबळ दिल्याबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

बारा वर्षांपासून रखडलेल्या या महत्त्वाच्या रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने सलगरवस्ती, सेटलमेंट तसेच दक्षिण सोलापूरकडे जाणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. रस्ता सुस्थितीत झाल्यामुळे वाहतुकीचा वेळ कमी होण्यासोबतच नागरिकांच्या प्रवासातही अधिक सुरक्षितता आणि सुलभता निर्माण होणार आहे.

## कळंबोलीत ९.२१ लाखांचा गुटखा साठा जप्त; एक ताब्यात, मुख्य आरोपी फरार

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.१४, पनवेल (नवी मुंबई) :** कळंबोली पोलिसांनी आणि अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने संयुक्त कारवाई करत सेक्टर-२ परिसरातील एका बंद खोलीत साठवून ठेवलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा जप्त केला आहे. या कारवाईत तब्बल ९ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ६८ वर्षीय परशुराम गुप्ता यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर या प्रकरणातील मुख्य आरोपी रोहित गुप्ता हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

कळंबोली परिसरातील उद्याने व सार्वजनिक ठिकाणी अमली पदार्थांचे सेवन वाढल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी नगरसेवक तथा शिवसेना जिल्हाध्यक्ष रामदास शेवाळे यांच्याकडे केल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत शेवाळे यांनी कळंबोली पोलिसांच्या मदतीने विविध भागांची पाहणी सुरू केली. यावेळी सेक्टर-२ येथील श्री अपार्टमेंट परिसरातील एका बंद खोलीबाबत संशय निर्माण झाल्याने पोलिसांनी तपासणी केली.

पोलीस उपनिरीक्षक अमोल चौगुले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या तपासणीत मोठ्या प्रमाणात गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आला. त्यानंतर अन्न



व औषध प्रशासनाच्या अन्नसुरक्षा अधिकारी अंकिता गावडे, विशाल तिवारी आणि प्रथमेश माने यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत सविस्तर पंचनामा केला. त्यानंतर संबंधित खोली सील करण्यात आली आणि अवैधरीत्या साठवून ठेवलेला संपूर्ण माल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी परशुराम गुप्ता यांना ताब्यात घेण्यात आले असून मुख्य सूत्रधार मानला जाणारा रोहित गुप्ता फरार आहे. त्याच्यावर पनवेल परिसरात यापूर्वीही विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, कळंबोली पोलीस ठाण्यापासून अवघ्या शंभर मीटर अंतरावर इतक्या मोठ्या प्रमाणात गुटखा साठवून ठेवला जात असताना यापूर्वी कारवाई का झाली नाही, असा प्रश्न रामदास शेवाळे यांनी उपस्थित केला. अनेक वर्षांपासून हा प्रकार सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी गुटखा विक्रेते व पुरवठादारांवर कठोर कारवाईची मागणी केली. पोलिस व संबंधित यंत्रणांनी अशा अवैध व्यवसायांवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. गुटखा, तंबाखू आणि अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यापासून युवक व विद्यार्थ्यांना वाचवण्यासाठी शिवसेनेच्या वतीने जागर नशामुक्तीचा हे विशेष अभियान कळंबोलीत सुरू करण्यात येणार असल्याची माहितीही शेवाळे यांनी दिली. या अभियानांतर्गत सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमार्फत प्रबोधन, नशामुक्तीची शपथ, विविध सामाजिक उपक्रम तसेच संशयित ठिकाणांवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात येणार आहेत. महिला आघाडीचाही या अभियानात सक्रिय सहभाग राहणार आहे.

या संयुक्त कारवाईमुळे कळंबोली परिसरातील गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले असून, अशा कारवायांमुळे अवैध विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. फरार आरोपीच्या अटकेनंतर या रॅकेटबाबत आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## पर्यावरणपूरक आणि पारंपरिक पद्धतींने गणेशोत्सव साजरा करा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, मुंबई :** परंपरेचे जतन आणि पर्यावरणाचे संरक्षण यांचा समतोल साधणे ही सामूहिक जबाबदारी आहे. गणेशोत्सवाचा आनंद घेताना पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. पारंपरिक पद्धतींचा आदर राखत पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

गणेश चतुर्थीच्या मंगलमय मुहूर्तावर मुख्यमंत्र्यांचे मुंबईतील अधिकृत निवासस्थान 'वर्षा' येथे श्रीगणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी सहकुटुंब पारंपरिक पद्धतीने बाप्पाची पूजा-अर्चा करून आरती केली.

श्रीगणेशाच्या चरणी प्रार्थना केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील तसेच देशभरातील गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

विघ्नहर्त्याने सर्वांच्या जीवनात आनंद आणून सर्व विघ्ने दूर करावीत. देश, राज्य, नागरिक आणि बळीराजासमोरील अडचणी दूर होऊन सर्वांना नवचैतन्य, सामर्थ्य आणि समृद्धी लाभावी, अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली.

मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहत आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा, आनंद आणि परंपरेचा उत्सव आहे. सर्व गणेशभक्तांनी हा उत्सव आनंदाने आणि भक्तिभावाने साजरा करावा. मात्र, गणेशोत्सवाच्या उत्साहाबरोबरच पर्यावरणाचे भान राखण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

## प्रशासनाने घालून दिलेल्या नियमपालनाचे पालन करण्याचे खा. प्रतिभा धानोरकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** 'द मराठा चॅरिटेबल ट्रस्ट' आणि 'बाळूभाऊ मित्र परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने न्यू इंग्लिश शाळेच्या मैदानावर पार पडलेल्या भव्य दहीहंडी महोत्सवात 'शीतल माता गोविंदा पथक, बाबुपेठ' यांनी सलग दुसऱ्यांदा उत्तुंग मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडून १,५१,००० रुपयांचे प्रथम पारितोषिक पटकावले आणि एक नवा कीर्तिमान प्रस्थापित केला. यावेळी विशेष उपस्थित असलेल्या खा. प्रतिभा धानोरकर यांनी, प्रशासनाच्या सूचनेनुसार आणि नियमांचे पालन करून डीजे वाजवल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले; तसेच आगामी काळात येणाऱ्या सर्व सण-उत्सवांमध्येही सर्व नागरिकांनी व मंडळांनी अशाच प्रकारे प्रशासकीय नियमांचे पालन करून डीजे वाजवावा, असे महत्त्वपूर्ण आवाहन केले. या सोहळ्याला राजुरा नगराध्यक्ष अरुण धोटे, वरोरा नगराध्यक्षा अर्चना ठाकरे, मूल नगराध्यक्षा एकता समर्थ, बल्लारपूर नगराध्यक्षा डॉ. अल्का वाढई, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्षा कुंदा जेनेकर, शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष शिवा राव, चंद्रपूर शहर महानगर पालिकेचे काँग्रेसचे गटनेते सुरेंद्र अडबाले, चंद्रपूर शहर महानगर पालिकेचे नगरसेवक तसेच सर्व नगर परिषदेचे नगरसेवक, यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती. उत्सवांतर्गत आयोजित विविध स्पर्धांमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दि. १२ सप्टेंबर रोजी कार्यक्रमाची सुरुवात दुपारी १८ वर्षांवरील महिलांच्या थरारक रस्सीखेच स्पर्धेने झाली. यामध्ये महिला संघांनी आपल्या ताकदीचे व संघभावनेचे प्रदर्शन घडवत प्रेक्षकांची दाद मिळवली. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक टग ऑफ वॉर १०,००० व चषक द्वितीय क्रमांक 'इरई' ७,००० तसेच चषक आणि तृतीय क्रमांक 'आझाद गोल्डन' ५,००० व चषक यांनी पटकावला. त्यानंतर ५ ते १० वर्षे वयोगटातील चिमुकल्यांसाठी 'भारतातील थोर महापुरुष' या विषयावर आधारित वेशभूषा स्पर्धा पार पडली. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांसारख्या विविध महापुरुषांच्या रुपात सजलेल्या बालगोपाळांमधून शिफा पवार हिने प्रथम ५,००० व चषक, संजीवन पवार याने द्वितीय ३,००० व चषक तर अहिल्या लालसरे हिने तृतीय क्रमांक २,००० व चषक पटकावला.




## अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला.

मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.

या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली.

या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# मोदक मी बाप्पाला दिला पण बाप्पाने मला काय दिले?

**– विजयकुमार कट्टी**

गणेशोत्सवाच्या दिवसांत घरात एक वेगळाच सुगंध दरवळतो नारळाचा, वितळलेल्या गुळाचा आणि नुकत्याच वाफवलेल्या उकडीचा. स्वयंपाकघरात मोदक बनत असतात. कुणी उकड मळत असते, कुणी सारण तयार करत असते, तर कुणाच्या बोटांवर मोदकाच्या घड्या उमटत असतात. लहानपणी माझे लक्ष मात्र त्या घड्यांकडे नव्हते; मोदक कधी ताटात येतो, याचीच उत्सुकता असायची.

**बाप्पाला मोदक आवडतो, एवढेच उत्तर तेव्हा पुरेसे होते.**

आजही त्या उत्तरातील भक्ती आणि आपलेपणा तसाच आहे. पण यंदा गणपतीसमोर मोदक ठेवताना मनात एक प्रश्न आलाआपण बाप्पाला मोदकच का अर्पण करतो? प्रश्न छोटा होता; पण त्याचा मागोवा घेताना मझ्या हातातला मोदक मला माझ्या घरापासून शेतापर्यंत, ऋतुचक्रापासून स्वयंपाकघरापर्यंत आणि वर्तमानापासून माझ्या आधीच्या पिढ्यांपर्यंत घेऊन गेला.

उकडीचा मोदक किती साधा तांदळाचे पीठ, नारळ आणि गूळ. पण या तीन पदार्थांकडे नीट पाहिले तर त्यांच्या मागे एक मोठी दुनिया दिसते. तांदूळ शेताची आठवण करून देतो. नारळ विशेषतः कोकणाच्या भूमीशी आणि किनारी जीवनाशी जोडतो. गूळ ऊसाच्या शेतीपर्यंत घेऊन जातो. गणेशोत्सव भाद्रपदात, पावसाळ्याच्या काळात येतो. आपल्या पारंपरिक अन्नसंस्कृतीत ऋतू आणि परिसर यांचा संबंध इतका सहज होता की तो वेगळा विचार करण्याची गरजच भासत नसे. आपल्या आजूबाजूला जे उपलब्ध आहे, त्यातूनच अन्न तयार होत गेले.

मग मला मोदकाच्या प्रमाणाचा विचार आला. किती तांदळाचे पीठ? किती नारळ? किती गूळ? किती पाणी? आज आपण हे सर्व काट्यावर मोजतो. पण घरातील अनुभवी हातांना हे अनेकदा स्पर्शाने कळत असे. उकड योग्य झाली आहे का, पीठाला अजून थोडे पाणी हवे का, सारणाची घट्टता योग्य आहे कायासाठी त्यांना मोजमापाच्या आकड्यांपेक्षा अनुभवावर विश्वास होता.

आज विज्ञान या प्रक्रियेतील बदल समजावून




सांगते. गरम पाण्यामुळे तांदळातील स्टार्चमध्ये बदल होतात आणि पीठाला मऊ, आकार देता येण्यासारखी उकड मिळते. पण माझ्या मनातला प्रश्न असा होताहे ज्ञान त्या आधीच्या हातांना कसे मिळाले असेल?

कदाचित प्रयोगातून. कदाचित चुकांतून. कदाचित आईकडून मुलीकडे, आजीकडून नातवंडाकडे पाहता-पाहता.

**हे ज्ञान पुस्तकात नसेल, पण हातात होते.**

मोदकाचा आकारही तसाच आहे. सपाट केलेल्या उकडीमध्ये सारण भरले जाते आणि बोटांनी कडा एकत्र आणताना घड्या पडत जातात. त्या घड्या सुंदर दिसतातच; पण त्यांचा व्यवहार्य उपयोगही आहेसारण आत सुरक्षित ठेवणे आणि पीठाला बंदिस्त आकार देणे.

या आकाराला भक्तिपरंपरेत ज्ञान, एकाग्रता किंवा अंतर्मुखतेचे अनेक अर्थ जोडले गेले आहेत. हे अर्थ आपल्या श्रद्धेला अधिक समृद्ध करतात. मात्र प्रत्येक अर्थ प्राचीन ग्रंथात तसाच सांगितला आहे, असे मानण्यापेक्षा, परंपरेभोवती काळाच्या ओघात निर्माण झालेले सांस्कृतिक अर्थ म्हणून त्यांच्याकडे पाहणे मला अधिक योग्य वाटते. उपयोगातून जन्मलेला आकार पुढे जाऊन प्रतीक बनतोकदाचित संस्कृती अशीच समृद्ध होत असावी.

मोदक वाफेवर शिजताना मला पुन्हा घरातील जुन्या स्वयंपाकघराची आठवण झाली. तापमान मोजणारी साधने नव्हती, डिजिटल टाइमर नव्हता; पण अनुभवी हातांना कधी झाकण उघडायचे, मोदक शिजला आहे की नाही, हे कळत असे. आज आपल्याकडे अधिक सुविधा आहेत. तयार पीठ आहे, यंत्रे आहेत, बाजारात तयार मोदक आहेत. आपण वेळ वाचवला आहे. पण त्याबरोबर घरातील काही अनुभवाधारित ज्ञान आपल्या हातातून निसटत तर नाही ना?

**हा प्रश्न मला विशेषतः आपल्या कुटुंबांकडे घेऊन जातो.**

मोदक बनवताना एका पिढीचे हात दुसऱ्या पिढीला शिकवत असतात. उकड अजून मऊ हवी, सारण जास्त भरू नको, घडी अशी पकडया छोट्या सूचना म्हणजे घरातील जिवंत पाठशाळाच. विशेषतः घरातील स्त्रियांनी अशा असंख्य पाककौशल्यांबरोबर ऋतू, पदार्थ, प्रमाण, साठवण आणि प्रसंग यांचे ज्ञान पिढ्यान्पिढ्या पुढे नेले. त्या ज्ञानाला नेहमी नाव मिळाले नाही; पण त्याने घरांची संस्कृती टिकवली.

आणि मग नैवेद्य आणि प्रसाद यांचा अर्थ नव्याने जाणवतो. आपण स्वतःसाठी केलेला पदार्थ आधी गणपतीसमोर अर्पण करतो. त्या क्षणी उपभोगापूर्वी कृतज्ञता येतेहे अन्न केवळ माझे नाही; ते मला मिळाले आहे. शेतकऱ्याचा श्रम, निसर्गाची देणगी आणि घरातील हातांचे योगदान आठवते. नंतर तेच अन्न प्रसाद म्हणून वाटले जाते. जे माझे होते, ते आपले होते.

आजच्या काळात ही भावना अधिक महत्त्वाची वाटते. अन्न आपल्या ताटात येईपर्यंत त्यामागे किती जमीन, पाणी, श्रम, ऊर्जा आणि वाहतूक असते, हे आपल्याला क्वचितच दिसते. उत्सवाच्या आनंदातही अन्नाचा आदर, योग्य प्रमाण आणि अनावश्यक अपव्यय टाळण्याची जाणीव ठेवता येते. परंपरेला पर्यावरणपूरक ठरवण्यापेक्षा, तिच्यातील कृतज्ञतेची भावना आजच्या जीवनात आपण कशी जगू शकतो, हा प्रश्न अधिक अर्थपूर्ण आहे.

महाराष्ट्रात मोदकाची एकच पद्धत नाही. उकडीचा मोदक आहे, तळलेला मोदक आहे; घराघरांत आकार, घड्या, आवरणाची जाडी आणि सारणाचे प्रमाण बदलते. ही विविधता मला परंपरेचा महत्त्वाचा गुण वाटते. परंपरा म्हणजे एकच साचा नव्हे; ती जगली जाते, बदलते आणि पुढे जाते.

आज गणपतीसमोर मोदक ठेवताना मला माझ्या आधीच्या पिढ्यांची आठवण येते. त्यांना कदाचित आजच्या वैज्ञानिक संज्ञा माहीत नसतील; पण ऋतूची जाण होती, पदार्थांची ओळख होती, प्रमाणाचा अनुभव होता आणि मिळालेले वाटण्याची सवय होती. त्यांनी जे जपले, ते माझ्यापर्यंत आले. आता माझ्या हातून पुढे काय जाणार, हा विचार माझ्यासमोर उभा राहतो. मोदकाकडे पाहताना मला आता फक्त त्याची गोडी दिसत नाही. त्यात मला घर दिसते, माती दिसते, श्रम दिसतो, आठवण दिसते आणि माझ्यापूर्वीच्या हातांची ऊब जाणवते.

मी शांतपणे गणपतीकडे पाहतो.

काही क्षण काहीच मागावेसे वाटत नाही.

फक्त मनात कृतज्ञता उमटते

ज्यांनी अन्न उगवले, ज्यांनी ते जपले, ज्यांनी स्वयंपाकाचे ज्ञान पुढे दिले आणि ज्यांच्या हातांनी हा वारसा माझ्यापर्यंत आणला, त्या सर्वांना मनापासून धन्यवाद.

समोर मोदक आहे.

आता तो मला केवळ बाप्पाचा आवडता गोड पदार्थ वाटत नाही.

तो मला माझ्या मुळांची आठवण करून देतो.

आणि मनात एक प्रश्न अलगद राहतो

**मोदक मी बाप्पाला दिला पण बाप्पाने मला काय दिले?**

## पावती

उत्सवा मागे उत्सव
भावनेचाखेळ सारा
आपल्या पैशावरती
नेते उभारी डोलारा

देणगी वर्गणी वसूलं
तिजोरी भरे सरारा
घरा भोवती फिरतो
गुंडा पुंडाचा पहारा

हुकूम तसा चालतो
रे नाही कुणी सहारा
पावतीपुस्तके सरली
पावत्या फाटे टरारा

खळ्ळ खट्याक ते
दहशत माजवे पोरा
चुप चाप दुकानदार
सहन करायचा तोरा

लुटे दंगलीत दुकान
पुरेसा त्यांचा इशारा
शांतीत कराया धंदा
द्यायचा चंदा इसारा

सारखे चाले उत्सव
वाढता सतत पसारा
देणग्या देऊन देऊन
धंदा आमचा घसारा

अन्याय का सोसावा
पहात राहतो देव्हारा
अशा सर्प दंशावरती
कसाआणावा उतारा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# डिजिटल समाज : एक आत्मपरीक्षण..!



बालपणी आजी-आजोबांच्या कुशीत शिरून आपण अनेक मौखिक गोष्टी ऐकल्या. त्या गोष्टी केवळ मनोरंजन नव्हत्या, तर त्या मानवी जीवनाला सामर्थ्यवान बनवणाऱ्या जीवनमूल्यांच्या शाळा होत्या. त्यापैकीच एक, सर्वांच्या अगदी जवळची असलेली गोष्ट म्हणजे 'टोपीवाला आणि माकडं'.

गोष्ट आपल्या सर्वांना ठाऊक आहे. एक टोपीवाला झाडाखाली झोपतो आणि झाडावरची माकडं त्याच्या टोपलीतल्या टोप्या पळवून डोक्यावर घालतात. हुशार टोपीवाला स्वतःच्या डोक्यावरची टोपी जमिनीवर फेकून देतो आणि त्याचे आंधळे अनुकरण करत माकडंही त्यांच्या टोप्या खाली फेकतात.

**बालपणीची गंमत, आजचं विदारक वास्तव**

बालपणात ही गोष्ट ऐकताना खूप गंमत वाटायची. पण आज या साक्षरतेच्या, डिजिटल आणि अख च्या अतिप्रगत युगात तीच गोष्ट हुबेहूब, किंबहुना अधिक विदारक रूपात आपल्या डोळ्यांसमोर दररोज घडताना दिसते आहे.

**माकडवृत्तीचा नवा अवतार – AI च्या युगात**

कधी ब्लॅक अँड व्हाईटच्या मोहात पडून '१९८० च्या दशकातले AI फोटो' बनवायचे, तर कधी स्वतःच्याच सुंदर चेहऱ्याचे विद्रुपीकरण करत स्वतःला 'कार्टून लूक' मध्ये पाहण्याचा अट्टाहास! कुणीतरी एक निरर्थक ट्रेंड सुरू करतो आणि काय आश्चर्य, सुशिक्षित, उच्चविद्याविभूषित मंडळीही मेंढरांच्या कळपाप्रमाणे डोळ्यावर आंधळी पट्टी बांधून त्या प्रवाहात उडी मारतात.

आपलं सामाजिक भान, आपलं अस्तित्व, आपला विवेक आणि आपली स्वतःची ओळख या आभासी ट्रेंडच्या गर्दीत कुठेतरी हरवून जाते. खरं तर ही निव्वळ आंधळी 'माकडवृत्ती' आहे.

गोष्टीतल्या माकडांकडे विचार करण्याची, सारासार विवेक करण्याची क्षमता नव्हती, म्हणून त्यांनी टोपीवाल्याची नक्कल केली, हे समजू शकतो. पण आज माणसाकडे अफाट बुद्धिमत्ता आहे, शिक्षण आहे, विज्ञान आहे, तरीही तो सोशल मीडियावर त्या माकडांसारखाच का वागतोय? हा खरा प्रश्न आहे.

**वाईटाचा ट्रेंड होतो, चांगल्याची उपेक्षा का?**

एखादी फालतू, निरर्थक आणि कधी कधी अश्लीलतेच्या जवळ जाणारी गोष्ट व्हायरल झाली की, लगेच त्याचा 'ट्रेंड' बनतो. लाखो लोक त्याची कॉपी करतात. पण याच समाजात एखाद्याने खरोखर समाजोपयोगी काम केलं – एखाद्या गरजूला मदत केली, एक झाड लावून जगवलं, आपला परिसर स्वच्छ केला, रक्तदान केलं, तर त्याचं अनुकरण करण्याचा विचार **किती जणांच्या मनात येतो?**

चांगल्या कृतीला आपण फक्त 'लाईक' आणि 'शेअर' देऊन मोकळे होतो. कौतुकाच्या दोन कमेंट करतो, पण स्वतः पुढे येऊन तेच चांगलं काम करण्याची प्रेरणा आपल्यात निर्माण होत नाही. चांगल्या कृतीचा ट्रेंड कधीच का बनत नाही? कारण वाईट आणि सोपं अनुकरण करणं नेहमीच सोपं असतं, चांगलं करण्यासाठी कष्ट लागतात.

**आजच्या युगातला खरा 'टोपीवाला' कोण?**

गोष्टीतल्या टोपीवाल्याने माकडांच्या या अनुकरणप्रियतेचा वापर करून स्वतःच्या टोप्या परत मिळवल्या, स्वतःचा फायदा करून घेतला. आजच्या काळात हेच काम मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या आणि अख कंपन्या करत आहेत. आपल्या याच 'अनुकरणप्रियतेचा', आपल्या डेटाचा वापर करून त्या कोट्यवधींचा गल्ला भरत आहेत. आपण आनंदाने आपले फोटो, आपली माहिती त्यांना देतोय आणि त्या बदल्यात आपल्याला काही सेकंदाचं क्षणिक, आभासी समाधान मिळतंय.

**माकड नाही, माणूस बना!**

तंत्रज्ञान हे शाप नाही, ते मानवाच्या प्रगतीसाठी, नवनिर्मितीसाठी असलेलं एक अत्यंत प्रभावी साधन आहे. त्याचा वापर गुलामासारखा नाही, तर मालकासारखा केला पाहिजे. म्हणूनच, सोशल मीडियावर कोणाच्यातरी तालावर नाचणारं 'माकड' बनण्यापेक्षा, स्वविवेक जपणारा, विचार करणारा 'माणूस' बना. दुसऱ्याच्या आंधळ्या ट्रेंडच्या मागे धावून आपलं अस्तित्व पुसण्यापेक्षा, स्वतःचं एखादं चांगलं, विधायक काम करून हाच नवा ट्रेंड कसा बनेल, याचा विचार करा.कारण माकडं फक्त नक्कल करतात, पण इतिहास मात्र माणसंच घडवतात. चला अवघे सारे स्वविवेक जपू,आंधळ्या ट्रेंडपासून दूर राहू...!

**– उदय दणदणे**
**सामाजिक कार्यकर्ता**
**पत्रकार (निवोशी।गुहागर)**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### पाइपला धडकून नाशिकमध्ये तरुणाचा करुण अंत; एक जखमी



**दि.१४. नाशिक :** सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर शहरात सुरू असलेल्या विकासकामांदरम्यान सुरक्षेच्या उपायांकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे निष्पाप नागरिकांचे बळी जाण्याचे सत्र थांबण्याची चिन्हे नाहीत. कृषिनगरकडून तिबेटीयन मार्केटमार्गे सिद्धार्थनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर आडव्या टाकलेल्या लोखंडी पाइपला दुचाकी धडकून झालेल्या भीषण अपघातात सिद्धार्थ दत्तात्रय गोरे यांचा मृत्यू झाला, तर त्यांचे मित्र मनोज सूर्यवंशी गंभीर जखमी झाले.

या घटनेनंतर संतप्त नातेवाईक व नागरिकांनी मृतदेह थेट महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर आणून ठेवत तीव्र आंदोलन केले. कडेकोट पोलिस बंदोबस्तात आणि प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

शनिवारी (दि. १२) रात्री साडेअकराच्या सुमारास सिद्धार्थनगर येथील कृषिनगर जॉगिंग ट्रॅकजवळ हा अपघात घडला. सिद्धार्थ दत्तात्रय गोरे (वय ३३, रा. साई सिद्धी रो-हाउस, अंबड; मूळ रा. उपेंद्रनगर) हे गंगापूर रोडवरील रुग्णालयात कार्यरत होते. काम आटोपून ते मित्र मनोज सूर्यवंशी यांच्यासोबत दुचाकीने (एमएच १५ एचबी ३०३५) घरी परतत होते. सिद्धार्थनगर परिसरात भूमिगत पाइपलाइनचे काम सुरू असल्याने रस्ता बंद करण्यासाठी लोखंडी पाइप रस्त्यावर आडवा टाकला होता. जोरदार पावसामुळे व कमी प्रकाशामुळे गोरे यांना रस्त्यातील अडथळा दिसला नाही. दुचाकी थेट पाइपवर आदळल्याने दोघेही रस्त्यावर फेकले गेले.

धडक इतकी भीषण होती की, दुचाकीचा पुढील भाग चक्काचूर झाला. स्थानिकांनी तत्काळ दोघांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, रविवारी (दि. १३) पहाटे अडीचच्या सुमारास उपचारादरम्यान सिद्धार्थ यांना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले. मनोज सूर्यवंशी गंभीर जखमी असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, सिद्धार्थ यांच्या पश्चात पत्नी, सहा महिन्यांची आणि दोन वर्षांची अशा दोन लहान मुली असा परिवार आहे.

**महापालिकेबाहेर प्रशासनाविरोधात घोषणाबाजी**

शवविच्छेदनानंतर संतप्त नातेवाइकांनी सिद्धार्थ गोरे यांचा मृतदेह थेट महापालिकेच्या राजीव गांधी भवन प्रवेशद्वारावर आणला. 'न्याय मिळेपर्यंत मृतदेह हलवणार नाही', अशी भूमिका घेत नातेवाइकांनी ठिय्या दिला. अचानक झालेल्या आंदोलनामुळे महापालिका परिसरात तणाव निर्माण झाला. पोलिस उपायुक्त मोनिका राऊत, वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज पतकी, गजेंद्र पाटील, राकेश चौधरी, श्रीनिवास देशमुख यांची पथके घटनास्थळी दाखल झाली. नातलगांनी महापालिका प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. दरम्यान, महिला नातलगांनी राजीव गांधी भवनासमोर रास्ता रोको केला. त्यात सिद्धार्थ यांची आई, पत्नी आणि लहान मुलीसह इतर नातलगांचा समावेश होता. 'लेखी आश्वासन मिळेपर्यंत हलणार नाही', अशी ठाम भूमिका नातलगांनी घेतल्याने परिस्थिती अधिकच तणावपूर्ण झाली.

स्थानिक लोकप्रतिनिधी प्रियंका दोंदे, किरण राजवाडे, प्रशांत खरात, प्रतिभा पवार आणि राकेश दोंदे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संतप्त नातेवाइकांच्या मागण्या महापालिका प्रशासनापुढे मांडल्या. महापालिकेचे शहर अभियंता अजय अग्रवाल यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. निष्काळजीपणा करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करणे, बाधित कुटुंबातील एका सदस्याला मानधनावर सेवेत घेण्याबाबत कार्यवाही करणे आणि आर्थिक मदतीबाबत प्रस्ताव सादर करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. सायंकाळपर्यंत गंगापूर पोलिसांत संशयित ठेकेदाराविरुद्ध गुन्हा नोंद झाला होता. पुढील तपास पोलिस करत आहेत.

### मी हातवारे केले नाहीत, फक्त म्हणालो, कुठलीही महिला बाप होऊ शकत नाही : संजय गायकवाड



**दि.१४, बुलढाणा :** आमदार संजय गायकवाड यांच्यावर एका वक्तव्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजप आमदार श्वेता महाले यांच्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर भाष्य करताना त्यांनी केलेल्या वक्तव्यावरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आमदार संजय गायकवाड यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. गुन्हा दाखल झाला आहे. त्यामध्ये अश्लील हावभाव करणे, अश्लील हातवारे करणे अशा प्रकारचा गुन्हा आहे. मी बोललो आहे की, कुठलीही महिला बाप होऊ शकत नाही. त्यासाठी पुरुषाचे शरीर आवश्यक असते. मला वाटते की माझे कुठलेही हातवारे नाहीत, आणि तसा माझा उद्देश नाही. मी सांगितले होते की त्या माझ्या ताई आहेत, असं संजय गायकवाड म्हणाले.

यामध्ये १०० टक्के राजकारण आहे आणि महाराष्ट्रात आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न आहे. ज्या महाराष्ट्रात ६ हजार पोरींचे संसार बसवले, ज्यांनी २५० ते ३०० मुली लव जिहादम धून वाचवलं, ज्या पळून गेलेल्या १ हजार, २ हजार मुली वापस आणल्या, त्या माणसावर अशा प्रकारचं लाच्छंद लावले, ते हलकटपणाचे लक्षण आहे. त्यांच्या दिवाळखोर बुद्धीची मला कीव येते. ठिक आहे. तुम्ही पक्ष वाढवा. शेवटी आपण महायुतीमध्ये आहोत, अशी भूमिका संजय गायकवाड म्हणाले.

भविष्यात महायुती झाली तर फायदा आम्हाला होईल. इतक्या हलकट लेवलवर कोणी जाऊ शकत नाही. तसे आमदार लेवलच्या व्यक्तीला शोभत नाही. कोणत्या माणसावर, ज्याने तोंडभरून ताई म्हटले किंवा ज्यांनी इतक्या मुलींचे रक्षण केलं, त्याच्यावर हा आरोप करणे योग्य नाही, असं संजय गायकवाड म्हणाले.

**संजय गायकवाड यांचा मंत्रालयासमोर आंदोलनाचा इशारा**

संजय गायकवाड यांना पत्रकारांनी पुढे काय करणार? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी गरज पडल्यास मंत्रालयासमोर आंदोलन किंवा उपोषण करेन. आमच्या जिल्ह्यात हे चाललंय ते थांबलं पाहिजे. महाराष्ट्र सरकार बदनाम होत चालले. मुख्यमंत्रीदेखील बदनाम होत आहे आणि आपला पक्ष पण बदनाम होत चालला आहे, असं गायकवाड म्हणाले.

**संजय गायकवाड यांचा पोलिसांवर आरोप**

शिवसेनेचा प्रत्येक कार्यकर्ता आक्रमक झालेला आहे. जिल्ह्यातील कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत की, जो माणूस कधीही बाईबद्दल वाईट एकूण घेत नाही, अशा प्रकाराचा गुन्हा दाखल करणं, त्यामुळे भावना दुखावल्या आहेत. सर्व कार्यकर्ते पोलिसांना घेराव करण्याकरिता एकत्र आले होते. मी सांगितले की, तुमच्या किती चुका मागच्या काळात झाल्या. तुम्ही कशाप्रकारे एकतर्फी कारवाई करत आहेत हे त्यांच्या लक्षात आणून दिले. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून फोन येतो आणि खोटी कारवाई केली जाते. खऱ्या लोकांवर अन्याय होत आहे. पोलिसांनी पारदर्शी वागले पाहिजे, अशी भूमिका संजय गायकवाड यांनी मांडली.

## बभळाज आर. सी. पटेल विद्यालयात राष्ट्रभाषा हिंदी दिवस साजरा



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि,१४. शिरपूर :** तालुक्यातील बभळाज येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात १४ सप्टेंबर राष्ट्रभाषा हिंदी दिवस व शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष

मा.आ.भाईसाहेब अमरीशभाई पटेल साहेब यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे ज्येष्ठ हिंदी शिक्षक बी. व्हि. मोरे होते. त्यांनी सर्व हिंदी विषय शिक्षकांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. हिंदी दिवसाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे विद्यालयातील इ. ७ वी ते इ.१० वी च्या विद्यार्थ्यांध्ये हिंदी भाषेत वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत एकूण २० विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी विषय 'ऋगॉव बनाम शहर','ऋछात्रों के लिए मोबाईल शाप या वरदान',ऋ स्पर्धेसाठी लहान गट व मोठा गट असे दोन गट तयार करण्यात आले होते.

**(इ.७ वी ते इ.८ वी लहान गट)**

या गटातून-खालील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

कु.जान्हवी पाटील (इ.८वी ब) प्रथम.

कु.नेहाली रतिलाल पाटील (इ.८ वी ब.) द्वितीय.

कु. मानवी जितेंद्र पाटील(इ.८ वी ब) तृतीय.

**(इ.९ वी ते इ.१० वी.मोठ्या गटातून)**

कु. धनश्री राजेंद्र पाटील (इ.१० वी ब)प्रथम.

कु. साक्षी पांडुरंग चौधरी (इ.१० वी. ब.) द्वितीय.

कु. अनुष्का अजमल पवार (इ.९ वी ब) तृतीय.

कु. निशा हटकर (इ.९ वी.अ) उत्तेजनार्थ.

हिंदी दिवसानिमित्त आयोजित स्पर्धांचे परीक्षण हिंदी विषय शिक्षक एस.एम.पाटील, रूपाली पाटील यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात बी. व्हि. मोरे यांनी हिंदी भाषेचे राष्ट्रीय स्तरावरील महत्व, हिंदी विषयाचे जीवनातील स्थान, हिंदी भाषा राजभाषा व राष्ट्रभाषा याचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विद्यार्थिनी देवयानी विलास पाटील व संस्कृती महेंद्र हाके यांनी केले. आभार नमिषा पाटील यांनी मानलेत. या कार्यक्रमाच्या प्रसंगी डी.ए.पावरा, आर.टी पाटील, बी.बी.लोहार, भारती पाटील, शितल पाटील, डी.के.पाटील इ . शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

## सुर्डीच्या शंकर कसबेंच्या कर्तृत्वाचा राज्यस्तरीय गौरव

### आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड; साहित्यिक योगदानाचीही राज्यस्तरावर दखल

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि,१४. सुर्डी, (बार्शी) :** ग्रामीण भागातून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत म ोलाचे योगदान देणारे सुर्डी गावचे सुपुत्र शंकर अभिमान कसबे यांच्या शैक्षणिक व साहित्यिक कर्तृत्वाचा राज्यस्तरावर गौरव होणार आहे. महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, बाळे, सोलापूर यांच्या वतीने दिला जाणारा 'कै. मातोश्री निर्मलाताई राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५-२६' यासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

शंकर कसबे हे सध्या सरस्वती प्रशाला, सिंदखेड, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथे सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्यासाठी ते विविध शैक्षणिक उपक्रम ांमध्ये सातत्याने योगदान देत आहेत.

शिक्षण क्षेत्रातील कार्यासोबतच कसबे यांनी साहित्य क्षेत्रातही आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या साहित्यिक योगदानाची दखल घेत त्यांची कविता इयत्ता सहावीच्या म राठी पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षक आणि साहित्यिक म्हणून त्यांच्या कार्याला विशेष मान्यता मिळाली आहे.



कै. निर्मलाताई शंकरराव ठोकळे यांच्या स्मरणार्थ देण्यात येणाऱ्या या पुरस्कारासाठी राज्यातील उपक्रमशील व गुणवंत शिक्षकांची निवड करण्यात येते. त्यामध्ये शंकर कसबे यांची निवड होणे ही त्यांच्या कार्याची पावती मानली जात आहे.

बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जनाई सभागृह, तुळशीदास नगर, बाळे, सोलापूर येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

शंकर कसबे यांच्या या दुहेरी यशामुळे सुर्डीच्या शैक्षणिक व साहित्यिक लौकिकात आणखी एक मानाचा तुरा खोवला असून, ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी, पालक, मित्रपरिवार व नातेवाईकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## आ. भोंगळे यांच्या नेतृत्वाला वाढता प्रतिसाद ; पक्षप्रवेशाची मालिका सुरुच

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, राजूरा (चंद्रपूर) :** ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि तळागाळातील नागरिकांच्या हक्कासाठी भारतीय जनता पक्ष नेहमीच अग्रभागी राहिला आहे. नभाजप हा केवळ सत्तेसाठी नव्हे, तर लोकहितासाठी अहोरात्र काम करणारा पक्ष आहे, असा ठाम विश्वास राजुरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवराव भोंगळे यांनी व्यक्त केला.

जिवती तालुक्यातील येल्लापूर येथील काँग्रेस व शेतकरी संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांनी आ. देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपमध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. भाजयुमो अनुसूचित जाती आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुबोध चिकटे यांच्या माध्यमातून गडचांदूर येथील जनसंपर्क कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी आ. भोंगळे बोलत होते.

आ. भोंगळे म्हणाले की, देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र म ोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासकामांना वेग आला आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवणे हेच आमचे अंतिम ध्येय आहे. पक्षाची सर्वसमावेशक धोरणे आणि गतिमान विकासकामांमुळे सर्वसामान्य नागरिक मोठ्या विश्वासाने भाजपकडे येत असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी आ. देवराव भोंगळे यांनी नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे भाजपचा दुपट्टा घालून स्वागत केले.



भाजपमध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांमध्ये कर्णू पाटील कुंभरे, जगेराव पेंदोर, मोतीराम पेंदोर, कांशीराम पेंदोर, रामूजी पेंदोर, भीम राव सोयाम, जंगुजी कुळमेथे, चंदू पेंदोर, माणिक मेश्राम, प्रकाश कांबळे, झोटिंग वाघवसे, मनोहर मोरताटे, किशोर कांबळे आणि संग्राम कांबळे यांचा समावेश आहे. दरम्यान,आ. देवराव भोंगळे यांच्या विकासकाम ांचा धडाका आणि त्यांच्या कुशल नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपमध्ये जाहीर पक्षप्रवेश केल्याची भावना नवप्रवेशित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी भाजपचे कोरपना तालुकाध्यक्ष संजय मुसळे, तालुका महामंत्री सतीश उपलेंचवार, जयंत भोंगळे, नितेश भिवापूरे, गणेश आदे, देविदास पेंदोर यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पावसा, शेतकऱ्यांचे अश्रू कधी पुसणार ?

पडला तर दुष्काळ, अन पडला तर महापूर… निसर्गाच्या याच लहरीपणाच्या चक्रात आज म हाराष्ट्राचा बळीराजा अडकला आहे. ज्या पावसाची चातकासारखी वाट पाहून शेतकरी डोळ्यात प्राण आणून आकाशाकडे पाहत असतो, तोच पाऊस कधीकधी त्याच्या डोळ्यांत अखंड अश्रू देऊन जातो. म्हणूनच आज प्रत्येक संवेदनशील मनाला एकच प्रश्न पडतोयपावसा, तू शेतकऱ्यांचे अश्रू कधी पुसणार?

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पण दुर्दैवाने, या कण्याला बळ देणारा शेतकरी आज स्वतः अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहे. पावसाचे आणि शेतकऱ्यांचे नाते हे अत्यंत भावनिक आणि जिव्हाळ्याचे आहे. पाऊस आला की काळ्या आईच्या कुशीत हिरवे कोंब हसू लागतात. पण गेल्या काही वर्षांत हे नाते बदलले आहे. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलामुळे पावसाचे गणित पार बिघडून गेले आहे.

कधी जून-जुलै महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नसतो. आणि यंदा तर सप्टेंबर महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नाही. पावसाअभावी पेरण्या उलटून जातात, कोवळी पिके करपून जातात. पाण्यासाठी आणि चाऱ्यासाठी जनावरे तडफडतात. आणि जेव्हा



पाऊस येतो, तेव्हा तो इतका अक्राळविक्राळ रूप धारण करतो की, अतिवृष्टी आणि महापुराने उभ्या पिकांचे वाटोळे होते. हातातोंडाशी आलेला घास एका रात्रीत वाहून जातो. निसर्गाच्या या दुहेरी मारामुळे शेतकरी पुरता कोलमडून गेला आहे.

शेतकरी शेतात फक्त घाम गाळत नाही, तर आपली स्वप्ने पेरत असतो. बँकेचे कर्ज, सावकाराचे देणे, बियाणे आणि खतांचा खर्च या सगळ्याचा ताळमेळ बसवताना त्याची दमछाक होते. पीक चांगले येईल आणि पोराबाळांचे शिक्षण, मुलीचे लग्न, घराची डागडुजी करता येईल, या आशेवर तो जगत असतो. पण जेव्हा निसर्ग लहरी बनतो, तेव्हा त्याच्या सर्व आशांवर पाणी फेरले जाते. कर्जाचा डोंगर आणि पिकांचे झालेले नुकसान यामुळे हताश होऊन अनेक शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. ही आपल्या समाजासाठी अत्यंत भूषणावह आणि वेदनादायी गोष्ट आहे.

पावसाने केवळ पाणी देणे पुरेसे नाही, तर त्याने वेळेवर आणि योग्य प्रमाणात येणे गरजेचे आहे. पण पाऊस तर निर्जीव आहे, तो मानवाच्या हातात नाही. मग शेतकऱ्यांचे अश्रू पुसणार कोण? केवळ निसर्गाला दोष देऊन चालणार नाही. यासाठी शासनाने आणि समाजानेही पुढे येण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळणे, कर्जमाफी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे, पीक विम्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तसेच वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात केली पाहिजे.

सगळ्या जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आज स्वतः उपाशी राहण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत हवामान बदलावर ठोस उपाययोजना होत नाहीत आणि शेतकऱ्याला त्याच्या घामाचे योग्य मूल्य मिळत नाही, तोपर्यंत त्याचे अश्रू पुसले जाणार नाहीत.

हे पावसा, तू निसर्गाचा नियम पाळ, पण थोडी दयाही दाखव. शेतकऱ्याच्या कष्टाचा आदर कर. यंदा तरी असा बरस की त्याच्या शेतात सोन्याचे पीक डोलेल आणि त्याच्या डोळ्यांतील अश्रू पुसले जाऊन तिथे आनंदाचे हास्य फुलेल!

**– बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**

# १३ वर्षीय शाळकरी मुलीचा विनयभंग

## व्हॅन चालकाविरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१४, नागपूर :** खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत मुख्य बाजारपेठेत एका दुकाना समोर १३ वर्षीय अल्पवयीन शाळकरी मुलीचा ५८ वर्षीय व्हॅन चालकाने विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी खापरखेडा पोलिसांनी आरोपी व्हॅन चालकाविरुद्ध पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला असून पालकवर्गात भितीचे सावट निर्माण झाले आहे.

किशोर रामजी कुंभारे (५८) सिल्लेवाडा ग्रामपंचायत समोर असे व्हॅन चालक आरोपीचे नाव आहे.!प्राप्त माहितीनुसार १३ वर्षीय अल्पवयीन मुलगी एका खाजगी शाळेत शिकते. घटनेतील आरोपी किशोर कुंभारे यांच्या व्हॅनने खापरखेडा परिसरात शिकवणी वर्गाला येत होती.

दिनांक १२ सप्टेंबर रोजी आरोपी व्हॅन चालक किशोर कुंभारे याने अल्पवयीन मुलीला रात्री ९ वाजे पर्यंत घरी सोडून देणार असल्याचे सांगितले. त्यामुळे अल्पवयीन मुलगी घाबरली घरी जाताच तिने आपले दप्तर बेड वर फेकून रडायला सुरुवात केली.

यावेळी अल्पवयीन मुलीला तिच्या आईने तिला विश्वासात घेतल्यानंतर ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ट्युशन संपल्यानंतर खापरखेडा मुख्य बथरा यांच्या दुकानासमोरून साहित्य खरेदी करून व्हॅनकडे परत येत असतांना व्हॅनचालक आरोपी किशोर कुंभारे याने विनयभंग केल्याचे सांगितले.

या प्रकरणी अल्पवयीन मुलीच्या पालकांनी खापरखेडा पोलीस ठाण्यात रितसर तक्रार नोंदवली.

खापरखेडा पोलिसानी १३ सप्टेंबर रविवार रोजी आरोपी किशोर कुंभारे विरुद्ध भारतीय न्याय संहिता बीएनएस कलम ७४, ७५ सहकलम ८, १२ बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (झजउडज) कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल पाटील पुढील तपास करत आहे.

# राजमाता निवासस्थानी गणरायाचे आगमन, ९६ वर्षांची परंपरा आजही अखंड

## आजोबांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवाचा तिसऱ्या पिढीकडून वारसा आ.जोरगेवार कुटुंबीयांकडून भक्तिभावाने गणरायाचे स्वागत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी यंदाही पारंपरिक उत्साह आणि भक्तिभावाने गणरायाचे आगमन झाले. जोरगेवार कुटुंबीयांकडून गेल्या ९६ वर्षांपासून अखंडपणे गणेशोत्सवाची परंपरा जपली जात असून, त्यांच्या आजोबांनी सुरू केलेल्या या गणेशोत्सवाचा वारसा आता तिसरी पिढी पुढे नेत आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता तब्बल ९६ वर्षांच्या कौटुंबिक परंपरेचा आणि संस्कारांचा साक्षीदार ठरला आहे.

जोरगेवार कुटुंबीयांच्या घरी गणेशोत्सवाची सुरुवात त्यांच्या आजोबांनी १९३१ मध्ये केली होती. भक्ती, श्रद्धा आणि कुटुंबातील एकोप्याच्या भावनेतून सुरू झालेली ही परंपरा काळाच्या ओघात अधिक समृद्ध होत गेली. पुढील पिढ्यांनीही ही परंपरा तितक्याच श्रद्धेने जपली असून, आता आ. किशोर जोरगेवार यांच्या कुटुंबीयांकडून या परंपरेला पुढे नेण्यात येत आहे.



गणरायाच्या आगमनाच्या निमित्ताने राजमाता निवासस्थानी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गणरायाची विधिवत पूजा-अर्चा करून कुटुंबीयांनी बाप्पाचे स्वागत केले. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, अशा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. यावेळी कुटुंबीय, नातेवाईक आणि आप्तेष्टांनी भक्तिभावाने गणरायाचे दर्शन घेतले.९६ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या गणेशोत्सवाच्या परंपरेत अनेक पिढ्यांच्या आठवणी जोडल्या गेल्या आहेत.

काळ बदलला, परिस्थिती बदलली, मात्र गणरायावरील श्रद्धा आणि कुटुंबीयांनी जपलेली ही परंपरा कायम राहिली. त्यामुळे या गणेशोत्सवाला धार्मिकतेसोबतच कौटुंबिक भावबंध आणि संस्कारांचेही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

घरगुती गणेशोत्सव हा केवळ पूजा आणि उत्सवापुरता मर्यादित न राहता कुटुंबाला एकत्र आणणारा संस्कारांचा उत्सव आहे. ज्येष्ठांनी जपलेल्या परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आणि त्यातून आपल्या संस्कृतीशी नाते अधिक दृढ करणे, हीच या ९६ वर्षांच्या गणेशोत्सवाची विशेषता आहे.

समाजातील दुर्जन शक्तींचा नाश व्हावा आणि जनतेच्या जीवनातील सर्व विघ्ने दूर व्हावीत. प्रत्येक कुटुंबात सुख, शांती, समाधान आणि समृद्धी नांदावी. समाजात निर्माण होणारी नकारात्मक ऊर्जा दूर होऊन तिचे सकारात्मक ऊर्जेत रूपांतर व्हावे, तसेच प्रत्येक व्यक्तीला नव्या आशेने आणि सकारात्मक विचारांनी पुढे जाण्याची शक्ती मिळावी. अशी मंगलमय कामना यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी गणरायाच्या चरणी केली आहे.

# उत्सव श्रद्धेचा हवा, शक्तीप्रदर्शनाचा नको...?

...बाप्पांच्या आगमनाची प्रतीक्षा संपली. गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात गजाननाचे आगमन झाल्याने महाराष्ट्रासह देशही सकारात्मक चैतन्याने भरून गेला आहे. बाप्पा दरवर्षी भक्तांच्या भेटीला येतात आणि दरवर्षी त्यांच्याकडे आपले काहीना काही मागणे असतेच, यंदाही आहेच. महागाई, बेरोजगारी, कुंठीत झालेली अर्थव्यवस्था, रखडलेले विकास प्रकल्प, रस्त्यांची दुरवस्था आदी विघ्ने तर आहेतच, सोबतच शिक्षक, नोकरदार, संघटित आणि असंघटित कामगार नोकरदार, कौशल्यावर आधारित काम करणारे महिला पुरुष असे सर्वच कर्मचारी, शेतकरी, छोटे मोठे व्यावसायिक आदी सर्वच घटक महागाईने पोळून निघत आहेत. त्यातच अपुऱ्या पावसाने राज्यावर दुष्काळाचे सावट आहे. अशा वेळी विघ्नहर्ताने राज्यकर्त्यांना, प्रशासनाला या संकटातून मार्ग काढण्यासाठी बळ द्यावे आणि भ्रष्टाचार, लालफितशाहीची मानवनिर्मित दिरंगाई दूर करण्याची बुद्धीही बुद्धीदात्याने संबंधितांना द्यावी. यंदाच्या गणेशोत्सवात देशातील बंधुभाव आणि सामाजिक ऐक्य अबाधित राहील याची काळजी घेण्याचे बळ येथील नागरिकांना यावे. धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकोपा धोक्यात येईल, असे कोणतेही वर्तन लोकांनी हाणून पाडायला हवे. मतांचे राजकारण आणि शक्तीप्रदर्शनासाठी देशातील उत्सवांचा होणारा वापर वेळीच रोखण्यासाठी आता त्या विघ्नहर्त्यानेच संबंधितांचे कान खेचायला हवेत. महाराष्ट्रात एकीकडे ७.९ टक्क्यांच्या आसपास आर्थिक विकासदर नोंदवला जात असला, तरी राज्यासमोर अनेक गंभीर आर्थिक, सामाजिक आणि राजकीय आव्हाने आहेत. 'लाडकी बहीण' आणि शेतकरी वीज सवलतींसारख्या मोठ्या कल्याणकारी योजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा ताण आला आहे. यातून महसुली तूट वाढत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी येत्या काळात धोरणात्मक प्रयत्न व्हायला हवेत.



अवकाळी पाऊस, हवामान बदल आणि उत्पादनाला योग्य भाव न मिळणे यामुळे कृषी विकासदर घसरला आहे. खरीप पिकांच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. मुंबई-ठाणे-पुणे पट्ट्यात सर्वाधिक गुंतवणूक होत आहे. तर मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात अपेक्षित औद्योगिक विकास पोहोचलेला नाही. त्यामुळे या नैसर्गिक संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी बाप्पांच्या आशीर्वादासह नागरिक आणि सत्तेनेही पक्षीय भेदाभेद विसरून एकत्रित प्रयत्न करायला हवेत. आर्थिक पातळीवर राज्यासमोर हे विघ्न असताना सामाजिक स्तरावरही सरकारची कसोटी लागणार आहे.

मराठा आरक्षण आंदोलन, ओबीसी घटकांमधील अस्वस्थता आणि धनगर आरक्षणाचा प्रश्न यांमुळे सामाजिक सौहार्दावर ताण निर्माण झाला आहे. शिक्षण, व्यवसाय आणि नोकरीच्या तुटपुंज्या संधी यामागचे खरे कारण आहे. जातीय भेदापलीकडे जाऊन यावर धोरणात्मक निर्णय व्हायला हवेत. उच्चशिक्षित तरुणांना त्यांच्या क्षमतेनुसार रोजगार न मिळणे आणि कंत्राटी पद्धतीवरील नोकऱ्यांमुळे निर्माण झालेली अनिश्चितता. मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांवर वाढणारा लोकसंख्येचा ताण,वाहतूक कोंडी, प्रदूषणाची समस्या आणि आरोग्य-शिक्षण क्षेत्रातील अपुऱ्या निधीचा प्रश्नही आहेच, त्यातूनच कर्मचाऱ्यांचे रखडलेले वेतन, कंत्राटदारांची थकीत बिले आदी मोठे आर्थिक प्रश्न यातून निर्माण झाले आहेत. राज्य आणि देशासमोर अशी मोठी आव्हाने असताना राजकीय पक्ष मात्र फुटीच्या राजकारणातच गुंतलेली आहेत.

लोकांच्या प्रश्नांपेक्षा सत्ता टिकवण्यावर भर दिला जात आहे. मागील विधानसभेच्या निवडणुकीत झालेले सत्तांतर आणि पक्षफुटीच्या राजकारणाचे दूरगामी परिणाम महाराष्ट्रावर होत आहेत. या संकटातून राज्याला वाचवण्याचे गाऱ्हाणे गणपती बाप्पाला घालावे लागणार आहे.

राज्यातील प्रमुख पक्षांमधल्या फुटीनंतर राजकीय वातावरणात निर्माण झालेली अनिश्चितता आणि तत्त्वांपेक्षा राजकीय समीकरणांना दिलेले प्राधान्य यातून महाराष्ट्राचे जे राजकीय अवमूल्यन झाले आहे, त्यासाठी राजकारण्यांना आता गणपती बाप्पानेच सुबुद्धी द्यावी. निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून राबवल्या जाणाऱ्या 'लोकांना आवडणाऱ्या' योजना आणि दीर्घकालीन भांडवली विकास यांच्यात संतुलन साधण्याचे मोठे आव्हान राज्यासमोर आहे, हे संकट टळावे, असेच सर्वसामान्यांचे मागणे आहे. महाराष्ट्र आणि गणेशोत्सव यांचं नाते जुने आहे.

श्री गणेशोत्सवामागे समाजसंघटन आणि सामाजिक प्रबोधनाचा उदात्त उद्देश होता. राज्यातील प्रबोधन परंपरा आणि बंधुभाव जोपासणारा गणपती बाप्पांचा उत्सव निसर्गाला साजेसा तसेच आणखी पर्यावरणपूरक व्हावा. बाप्पांवरील प्रेम, श्रद्धा व्यक्त करण्यासाठी भव्य दिव्य खर्चिक उत्सव आयोजनाची गरज नाही. बाप्पांचे कान आधीच मोठे आहेत, त्यामुळे बाप्पांना आवाजी आणि गोंगाट करणाऱ्या उत्सवाने त्रासच संभवतो. त्यासाठी रक्तदान, आरोग्य शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत आदी समाजोपयोगी उपक्रम राबवूनही आपण बाप्पांच्या आवडीचा गणेशोत्सव साजरा करू शकतो. भक्तांनी मनोभावे अर्पण केलेल्या २१ दुर्वा, जास्वंदाचे पुष्प आणि प्रेम भक्तीभावाने बनवलेल्या केवळ मोदकाच्या गोडव्यावर गणपती बाप्पा आनंदी होईल, त्याला आणखी काही नको. गणपती बाप्पांचा उत्सव राजकीय शक्तीप्रदर्शनासाठी नाही. गणेशोत्सव आपल्या राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक हेतूंची जाहिरातबाजी साध्य करण्यासाठीचा अवाजवी 'इव्हेंट' ही नाही. देवबाप्पांकडून एवढी बुद्धी जरी आपल्याला घेता आली तरी पुरेसे आहे. राज्यासमोरील उभ्या ठाकलेल्या आव्हानातून लवकरच मार्ग निघेल आणि तो विघ्नहर्ता, सुखकर्ता, मंगलमूर्ती मोरया सर्वच मंगलदायक करेल यात शंका नाही. सध्या डीजे आणि

डॉल्बीच्या भयकंपित करणाऱ्या आवाजाविरोधात अनेक नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत, याची दखल घेण्याची सुबुद्धी शासन, प्रशासन आणि पोलिसांना गणपतीबाप्पाकडून मिळावी, गणेशोत्सव हा श्रद्धेचा व्हावा, शक्तीप्रदर्शनाचा नसावा, अशीच सर्वसामान्य नागरिकांची भावना आहे. कारण लोकप्रतिनिधी आणि मंडळांच्या शक्तिप्रदर्शनात सामान्य नागरिक चिरडून जातात, त्यांचे जगणे अवघड होऊन बसते.

## थोडक्यात बातम्या

### भानेगाव कोळसा खान परिसरात बिबट्याचे दर्शन; परिसरात दहशतीचे वातावरण



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१४, नागपूर :** खापरखेडा नजीक भानेगाव ओपन कास्ट कोळसा खान कन्व्हेअर कोल पाईप बँकर परिसरात दिनांक १३ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास बिबट्याने दर्शन दिल्याने परिसरात दहशत निर्माण झाली आहे.प्राप्त माहिती भानेगाव ओपन कास्ट कोळसा खान परिसरात महानिर्मितीचा कन्व्हेअर कोल पाईप वे प्रकल्प सुरू आहे. याठिकाणी भानेगाव, शिंगोरी, गोंडेगाव आदी कोळसा खाणीतून कोळसा आणला जातो. कन्व्हेअर कोल पाईप वे बँकरच्या माध्यमातून खापरखेडा व कोराडी औष्णिक वीज केंद्राला कोळसा पुरवठा केला जातो.दुपारी ४ वाजताच्या सुमारास कन्व्हेअर कोल पाईप वे बँकर परिसरात रस्ता ओलांडताना बिबट्या आढळून आला. परिसरात बिबट्याच्या पायाचे ठसे उमटले आहेत. मागील अनेक महिन्यापासून या परिसरात बिबट्याचा वावर आहे. यापूर्वी बिनासंगम, शिंगोरी, भानेगाव परिसरातील जवळपास अर्धा डझनाच्या वर बिबट्याने गाईची शिकार केली आहे. मात्र, वनविभाग प्रशासन बिबट्याला जेरबंद करण्यात अयशस्वी ठरले आहे. पारशिवनी, कामठी, खापा वनपरिक्षेत्रच्या अधिकाऱ्यांनी वेळीच दखल घेऊन तात्काळ बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी केल्या जात आहे.

### गावातील महिलांनी भक्तिभावाने केले हरतालिका पूजन

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१४, सोयगाव (छ.संभाजीनगर) :**



गलवाडा (ता.सोयगाव) येथे सोमवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२६ रोजी महिलांनी भक्तिभावाने हरतालिका पूजन केले. यावेळी शारदा इंगळे यांनी हरतालिकेची पोथी वाचून व्रताचे धार्मिक महत्त्व उपस्थित महिलांना सांगितले. हरतालिका हे हिंदू धर्मातील महिला व कुमारिकांसाठी महत्त्वाचे धार्मिक व्रत मानले जाते. विवाहित महिला पतीच्या दीर्घायुष्यासह अखंड सौभाग्यासाठी, तर कुमारिका मनासारखा जीवनसाथी मिळावा यासाठी हे व्रत करतात. पौराणिक मान्यतेनुसार, माता पार्वतीने भगवान शिवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली होती. त्याच्या स्मरणार्थ हे व्रत केले जाते. पूजनासाठी शारदा इंगळे, सरूबाई इंगळे, मंगलाबाई इंगळे, सरला इंगळे, शारदाबाई लवटे, मालुबाई लवटे, लताबाई इंगळे, रीना इंगळे, अनुसयाबाई लवटे, माधुरी लवटे यांच्यासह गावातील महिला उपस्थित होत्या.

### पर्यावरणपूरक गोमय गणपतीने पोलिस ठाण्यात विराजमान होणार बाप्पा

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१४, सोयगाव (छ.संभाजीनगर) :**



गणेश चतुर्थीनिमित्त क्रांती जनहित बहुउद्देशीय संस्था, आमखेडा संचलित अंजनाई गोशाळे तर्फे सोयगाव पोलिस ठाण्यास पर्यावरणपूरक गोमय गणेशमूर्ती भेट देण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष संदीप इंगळे यांच्या हस्ते ही मूर्ती सहाय्यक पोलिस निरीक्षक दिनकर गोरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.यावेळी सपोनी दिनकर गोरे यांनी गोमय गणेशमूर्तीच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश दिल्याबद्दल अंजनाई गोशाळेच्या कार्याचे कौतुक करून संस्थेला प्रोत्साहन दिले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष ईश्वर इंगळे, सचिव दिलीप शिंदे, संचालक अशोक ढगे, ज्ञानेश्वर गाडेकर, फौजदार गजानन आरेकर, गजानन दांडगे, कुणाल जाधव, शांताराम सपकाळ, अजय कोळी, ज्ञानेश्वर दांडगे, संजय बाम्हंदे, सादिक तडवी आदी उपस्थित होते.

### चंद्रपूर जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीत ११३९ प्रकरणे यशस्वीपणे निकाली




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष अभय लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली १२ सप्टेंबर २०२६ रोजी चंद्रपूर जिल्हा न्यायालयासह जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये एकूण १० हजार ४६ प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे आणि १० हजार ३४४ दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी १ हजार २७ प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे आणि ११२ दाखलपूर्व प्रकरणे अशी एकूण १ हजार १३९ प्रकरणे यशस्वीपणे निकाली काढण्यात आली. लोक अदालतीमध्ये मोटार अपघात नुकसानभरपाईची ८४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमध्ये एकूण १० कोटी ३८ लाख ९ हजार ६७० रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली. तसेच दाखलपूर्व प्रकरणांमध्ये ८६ लाख ३१ हजार २०५ रुपयांची वसुली करण्यात आली. धनादेश अनादराच्या प्रकरणांपैकी ३४ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय लोक अदालत ही पक्षकारांना परस्पर सामंजस्याने व तडजोडीच्या माध्यमातून वाद निकाली काढण्यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. यामुळे पक्षकारांचा वेळ आणि खर्च वाचण्यासोबतच प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा होण्यास मदत होते. जिल्ह्यातील राष्ट्रीय लोक अदालत यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायाधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूरचे सचिव एस.एस.इंगळे यांनी दिली.